क्रमांक : १७९४२ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : २५/११/२०२१

**: : परिपत्रक ::**

विधानमंडळ समित्यांच्या मा. समिती प्रमुख यांना त्यांच्या कार्यालयीन कामकाजात सहाय्य करण्यासाठी या सचिवालयाच्या आस्थापनेवर स्वीय सहायक व शिपाई संवर्गातील पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. ही पदे मा.समिती प्रमुख यांनी पसंती दर्शविलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीने भरण्यात येतात. मा.समिती प्रमुखांनी स्वीय सहायक या पदासाठी सहायक कक्ष अधिकारी किंवा लिपिक-टंकलेखक पदावरील कर्मचाऱ्यांची निवड केल्यास त्यांची त्यांच्या कार्यालयात नियुक्ती करण्यात येते. याच पद्धतीने मा.समिती प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयातील शिपाई पदावर गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्याची निवड केल्यावर त्याची नियुक्ती करण्यात येते.

या कार्यालयाच्या आस्थापनेवर स्वीय सहायक व शिपाई संवर्गातील पदे निर्माण करण्यात आलेली आहेत व ही पदे सचिवालयातील समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीने भरण्यात येत असल्याने या पदावरील कर्मचाऱ्यांना या सचिवालयात समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवा /शर्तीचे नियम लागू असून त्यांचे वर्तन कार्यालयीन कार्यपद्धतीप्रमाणे असणे बंधनकारक आहे. त्यानुसार त्यांनी त्यांच्या कार्यालयातील उपस्थितीची दैनंदिन नोंद हजेरीपटावर करणे आवश्यक आहे. मा.समिती प्रमुखांच्या कामानिमित्त कार्यालयात उशिरा उपस्थित राहणे किंवा कार्यालयात अनुपस्थित राहणे तसेच रजेच्या संदर्भातील अर्ज संबंधित समिती कक्षाच्या अधिकाऱ्यांमार्फत आस्थापना कक्षाकडे प्राप्त होणे आवश्यक आहे.

अत: मा.समिती प्रमुख यांच्या कार्यालयात कार्यरत स्वीय सहायक व शिपाई कार्यालयात उशिराने उपस्थित राहिल्यास त्यासंदर्भातील अर्ज व सर्व प्रकारच्या रजेसंदर्भातील अर्ज त्यांनी संबंधित समिती कक्षाच्या अधिकाऱ्यांमार्फत आस्थापना कक्षाकडे संबंधित आठवड्याच्या अखेरच्या कामकाजाच्या दिवशी पाठविण्याची दक्षता घेण्यात यावी अन्यथा त्यांची कार्यालयात अनुपस्थिती समजण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी.

आदेशानुसार

मोकाकड

**(मोहन काकड)**
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

मा.समिती प्रमुखांचे सर्व स्वीय सहायक व शिपाई

**प्रतिलिपी,**

१) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ यांचे कार्यालय.

२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व समितीप्रमुखांची कार्यालये

३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.